# गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## अमरावती - ४४४६०२ (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्र. ०७२१-२६६२१७३ वेबसाईट क्र. www.sgbau.ac.in. ई-मेल-pro@sgbau.ac.in

---

क्र. संगाबाअवि/पीआरओ/१५१/38/२०२६
दिनांक- 20/०५/२०२६

**विषय :- इलेक्ट्रॉनिक्स मिडीया साठी ऑनलाईन व्हीडीओ चित्रण आदीसाठी दराचे कोटेशन पाठविणेबाबत ...**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने होणारे विविध कार्यक्रम,उपक्रम, उपलब्धी, योजना आवाहने व सुचनांचे बातमीसह व्हीडीओ चित्रण इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, सोशल मिडीया व यु-टयुबवर देण्याकरीता मिडीया सेवा घेण्यासंदर्भात विद्यापीठ व्यवस्थापन परिरषदेने गठित समिती क्रमांक ७/२०१९ च्या शिफारसी मान्य करुन इलेक्ट्रॉनिक्स मिडीया सेवा घेण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेप्रमाणे विद्यापीठात होणारे विविध कार्यक्रम, उपक्रम,उपलब्धी, योजना, आवाहने व सूचना आदींचे व्हीडीओ चित्रण करुन त्यावर योग्य ते संस्करण करुन ते इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, सोशल मिडीया व यु-टयुबवर अपलोड करण्याकरीता खालील प्रमाणे दर मागविण्यात येत आहे. कृपया दर आवक शाखेत **दिनांक२९/०५/२०२६** रोजी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत पाठवावेत.

| अ.क्र. | विवरण | दर (सर्व करासह) |
|---|---|---|
| १ | विविध कार्यक्रम,मुलाखती,उपक्रम, उपलब्धी, योजना आवाहने व सूचना आदींचे लाईव्ह व्हीडीओ चित्रीकरण व विद्यापीठ युटयुब चॅनलवर थेट प्रक्षेपण करणे तसेच या बाबतचा सोशल मिडीया संदेश तयार करुन संबंधीताकडे पाठविणे.कार्यक्र मा आधी Live Link तयार करुन पाठविणे. (कमाल दोन तास मर्यादेपर्यंत तसेच एक कॅमेरा) | |
| २ | थेट प्रक्षेपणासाठी अतिरीक्त व्हिडीओ कॅमे-यांची गरज भासल्यास प्रती कॅमेरा दर. (दोन तास मर्यादेपर्यंत) | |
| ३ | लाईव्ह उपक्रमाचे प्रक्षेपण दोन तासांपेक्षा अधिक काळासाठी असल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तासासाठी दर. | |
| ४ | थेट प्रक्षेपणासाठी कार्यक्र माची माहिती होईल अशा स्वरुपाची डिजीटल फ़्लेक्स (इमेज) तयार करुन देणे | |
| ५ | चित्रीकरणाचा व्हीडीओ पेन ड्राईव्ह ( ३२ जीबी क्षमता) मध्ये देण्यासाठी प्रती पेन ड्राईव्ह दर. | |

**कामाच्या अटी व शर्ती :-**

१) विद्यापीठातील कार्यक्रम/उपक्रमाची संक्षीप्त सुचना तयार करुन सदर चित्रफीत सोशल मिडीयावर अपलोड करावी लागेल. कार्यक्रमापुर्वी त्याची Link उपलब्ध करुन द्यावी लागेल.

२) कार्यक्र माचे व्हीडीओ शुटींग झाल्यानंतर चित्रफीत विद्यापीठ युटयुब चॅनलवर अपलोड करावी लागेल.

३) ऑनलाईन प्रसारण करणेसाठी युटयुबसह झुमची सुध्दा आपल्याला व्यवस्था करावी लागेल.

४) विद्यापीठ संगणक विभागाशी समन्वय साधुन ज्या ठिकाणाहुन लाईव्ह करावयाचा आहे,त्यासाठी इंटरनेट व्यवथेची माहिती घेवुन एजन्सीला इंटरनेट व्यवस्थेशी जुळवून घ्यावे लागेल.

५) विद्यापीठाने कोणत्याही वेळी आदेशीत केल्यास एक तासाचे आंत लाईव्ह करण्याची व्यवस्था करुन द्यावी लागेल.

(पुढील पान क्र.२ वर)

६) सदर काम करणा-या एजन्सीला सोशल मिडीयासाठी चित्रफित तयार करण्याचा किंवा गुलाखती , छायाचित्रण व संपादन करण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक राहिल किंवा इलेक्ट्रॉनीक मिडीया, मुद्रित प्रसार माध्यमे व जनसंपर्क क्षेत्रात कार्यरत एजंन्सी अथवा अनुभवी व्यक्ती, ज्यांना शिक्षण क्षेत्रात कार्य करण्याचा विशेषतः विद्यापीठाच्या कार्याचा अनुभव आहे अशा एजन्सीला प्राधान्य दिले जाईल.

७) उपरोक्त दर सर्व करासह असतील,याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे दर देण्यात यावे.

८) कोटेशन सादर करतेवेळी शॉप ॲक्ट चे नोंदणी असल्याचे दस्तऐवज सोबत जोडावे लागेल.

९) चित्रण दर्जेदार कॅमेराव्दारे करावे लागेल.

१०) एडिटींग व अनुषंगिक सॉफ्टवेअर संबंधित
ा फर्मला उपलब्ध करुन द्यावे लागेल.

११) रेकॉर्ड केलेली चित्रफित पेन ड्राईव्ह मध्ये उपलब्ध करुन द्यावी लागेल.

**कुलसचिव**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी माहितीस्तवः-

सहा. कुलसचिव (प्रशासन) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ